**विशेष दिवाणी दावा क्रमांक – २३/२०२०**
**नि.क्र. ३५/क सोबत**

**उलटतपास शपथेवर सुरु**
**उलटतपास प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. व्ही. पी. चुडमुंगे यांचे तर्फे सुरु :-**

४. वादी ही माझी आई आहे. प्रतिवादी नं.१ ही माझी मावशी आहे. मी माझ्या आई सोबत राहतो. हे म्हणणे खरे नाही की, आमचे सर्व व्यवहार मी पाहतो. मी ॲटोमोबाईल इंडस्ट्रीज, जयसिंगपूर येथे काम करतो. माझे कामाची वेळ सकाळी ८.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत असते. आण्णा माळी हे माझे आजोबा आहेत. आण्णा माळी यांना आप्पासाहेब, बाळासाहेब, सुजाता, विमल, महादेवी अशी मुले आहेत. बाळासाहेब मयत आहेत. बाळासाहेब यांचे वारसांची नोंद सातबारा पत्रकी झाली आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईने वाटपासाठी रे.क.नं.७३/२०८ दाखल केला होता. हे मला आठवत नाही की, आईने व विमल ने संगनमत करुन दावा केला होता. मी सदर दाव्याचे कामी कधीही न्यायालयात गेलेलो नाही. माझे आईने वर नमुद दाव्याच्या नंतर जमीन कोर्टामार्फत तुटक करुन घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मावशीने तिचा हिस्सा तुटक करुन घेतलेला नाही. हे मला माहित नाही की, विमल हिचा हिस्सा आप्पासाहेब व बाळासाहेब यांचे वारसांच्या कडे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने आप्पासाहेब व बाळासाहेब यांचेकडून तिचा हिस्सा तुटक करुन घेतला आहे.

६. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ७.२.२०१७ चा करार तेरवाडकर स्टँम्प रायटर यांनी लिहिला. त्यावेळी आम्ही एकूण चार जण हजर होतो. त्यावेळी पैशाचा देणे घेणेचा व्यवहार झाला होता. त्यावेळी माझे आईने विमल हिला १६-२० हजार रुपयांच्या आसपास रक्कम दिली होती. तसे करारपत्रात नमुद केलेले नाही. माझी मावशी निरक्षर असून ती माणकापूर येथे राहते. हे म्हणणे खरे नाही की, तिचे

घर पडीक आहे. हे मला माहित नाही की, तिचे घरी विज कनेक्शन आहे किंवा नाही. हे मला माहित नाही की, ती काय काम करते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, ती मजुरीने काम करते. विमलचे पती हयात असून ते मजुरी करतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे. त्यांच्या कडे चार चाकी नाही. त्यांच्या मालकीच्या दुचाकी आहेत का याबाबत मला माहिती नाही.

७. दिनांक ७.२.२०१७ रोजीचे करारपत्राचा मसुदा साध्या कागदावर विमल माळी व अमोल माळी यांनी लिहुन आणला होता. त्यानंतर तेरवाडकर यांनी तो मसुदा टाईप केला. तेरवाडकर यांनी टाईप करणार म्हणुन सही केली होती. गट नं.७५० चे सातबारा उता-याला एकूण २हे.२५ आर इतके क्षेत्र आहे. गट नं.७५० चे सातबाराला सहा हिस्सेदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, २हे.२५ आर क्षेत्र हे सर्व हिस्सेदारांच्या समाईकात आहे. माझ्या आईने केलेला दावा हा १हे.७८आर साठी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ७.२.२०१७ रोजी करार लिहिला त्यावेळी वाटप झाले नव्हते.

८. माझी आई सही करते. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे आईने मिळुन माझे मावशीला फसवुन खोटे करारपत्र लिहुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मावशीला करारापत्रा बद्दल काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, करार माझे मावशीने कच्चा तयार करुन आणला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, करार टाईप करणा-याची सही त्याचेवर नाही. करारपत्रावरील पान नं.६ मध्ये तारखेत खाडाखोड दिसत आहे. हे मला माहित नाही की, तारखेच्या ठिकाणी ९.२.२०१६ च्या ऐवजी ९.२.२०१७ केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला काही माहित नसताना मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, करारातील संपुर्ण मजकुर खोटा लिहिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने कराराच्या पूर्वी अगर कराराचे वेळी करारात नमुद केले प्रमाणे रक्कम रुपये दहा लाख दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.७५० च्या सातबारा पत्रकी नोंदी

ह्या कोर्टाचे आदेशाप्रमाणे झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मावशीचा पूर्वी माझे आईवर पुर्ण विश्वास होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने मावशीचे विश्वासाचा गैरफायदा घेऊन १५ गुंठयाचे खोटे बक्षीसपत्र तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, करारपत्राचे वेळी माझ्या मावशीला कोणत्याही रक्कमेची गरज नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by
GANI MANIK NADAF
Date: 2026.08.24
16:40:53 +0530

दिनांक – २४.०८.२०२६

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.